अति तात्काळ :

(२)

स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपत्र-सन्मानपत्र देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक - टीएमपी -१२८३-विक-२,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २ मे, १९८३.

शासन निर्णय :- केंद्र शासनाने स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपत्र देण्याची योजना मे १९७८ मध्ये बंद केली होती. जुलै, १९८० मध्ये ती पुन्हा सुरु करण्यांत आली. त्यानंतर आवश्यक त्या संख्येत ताम्रपत्र उपलब्ध नसल्याने तसेच केंद्र शासनाकडून ताम्रपत्र न मिळाल्यामुळे मध्यंतरीच्या काळात ताम्रपत्र वितरण समारंभ आयोजित करणे शक्य झाले नाही.

२. केंद्र शासनाने आता ताम्रपत्राची आवश्यक ती संख्या पुरविली असल्याने १४ मे, १९८३ या शिवजयंतीच्या दिवशी स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपत्र व सन्मानपत्र वितरण समारंभ मुंबईत व प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी घेण्यात यावा असे शासनाने ठरविले आहे. बृहन्मुंबईतील स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपत्र व सन्मानपत्र देण्याची व्यवस्था सामान्य प्रशासन विभागामार्फत करण्यात येणार आहे, व जिल्हयाच्या ठिकाणी ही व्यवस्था जिल्हाधिकारी करतील. जिल्हाधिका-यांनी या कामी जिल्हा गौरव समितीचा सल्ला घेवून समारंभाची व्यवस्था करावी. बृहन्मुंबईतील स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपत्र - सन्मानपत्र देण्याचा समारंभ टाऊन हॉल मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल. जिल्हयाच्या ठिकाणी देखील हा समारंभ दिनांक १४.५.१९८३ ला त्याच वेळेस शक्यतो घेण्यात यावा.

३. या समारंभाच्या संदर्भात खालील सूचना देण्यात येत आहेत.

१] ताम्रपत्र केवळ हयात असलेल्या व ज्याना यापूर्वी झालेल्या समारंभात ताम्रपत्र- सन्मानपत्र देण्यात आले नाहीत अशाच स्वातंत्र्य सैनिकांना द्यावयाचे आहेत. दिवंगत स्वातंत्र्य सैनिकाची पत्नी अथवा वारसदार यांना द्यावयाचे नाहीत.

२] ताम्रपत्र - सन्मानपत्रावर ज्या ठिकाणी नावे घालण्यासाठी जागा ठेवण्यात आली आहे त्या ठिकाणी संबंधित स्वातंत्र्य सैनिकाचे :

...२..

संपूर्ण नांव घालावे. स्वातंत्र्य सैनिकांचे नाव योग्य प्रकारे घातले जावे यासाठी संबंधित स्वातंत्र्य सैनिकाकडून त्याचे नांव कागदावर लिहून घ्यावे. उदा. श्री. एस. पी. राऊत याऐवजी श्री. शंकर पांडूरंग राऊत असे नांव घालण्यात यावे.

३] ताम्रपत्र मिळण्यास पात्र असलेल्या स्वातंत्र्य सैनिकाविरुद्ध स्वातंत्र्योत्तर काळात गुन्हा शाबीत होऊन दोषी ठरविण्यात आले असेल तर अशा स्वातंत्र्य सैनिकास ताम्रपत्र केंद्र शासनाची पूर्व संमती घेतल्याशिवाय देण्यात येऊ नये. जिल्हाधिकाऱ्यांनी अशा स्वातंत्र्य सैनिकांची नांवे राज्य शासनास आपल्या सविस्तर अहवालासह कळवावीत.

४] समारंभाचे ठिकाण सर्व दृष्टीने सोईस्कर असे असावे.

ज्या स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपत्र- सन्मानपत्र द्यावयाचे आहे त्यांची बसण्याची व्यवस्था व्यासपिठाजवळ सन्मानपूर्वक करावी.

५] स्थानिक वर्तमानपत्रामधून या समारंभाची जाहिरात करणेदेखील आवश्यक आहे.

६] ताम्रपत्र-सन्मानपत्राचे वितरण शक्यतो जिल्ह्यातील सर्वात ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकाच्या हस्ते करावे.

या समारंभात गुलाबाचे फुल देऊन स्वातंत्र्य सैनिकाचा सन्मान करावा.

७] समारंभासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: उपस्थित राहून जिल्ह्यातील प्रमुख स्वातंत्र्य सैनिकांना, नेहमी समारंभासाठी बोलाविले जाते त्या सर्व व्यक्तींना/अधिकाऱ्यांना निमंत्रित करावे. समारंभाचे निमंत्रण संबंधितांना समारंभापूर्वी मिळेल याची खात्री करून घेण्याची आवश्यकता आहे.

८] ताम्रपत्र- सन्मानपत्र स्वीकारण्यासाठी येणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना येण्याजाण्याचा प्रथम वर्गाचा रेल व बस प्रवासभत्ता द्यावा हे तसेच त्यांची रहाण्या/जेवण्याची सरकारी पाहुणे म्हणून व्यवस्था जरुर करावी.

९] एखाद्या ठिकाणी जर समारंभासाठी येणारे स्वातंत्र्य सैनिक फार दूरवरून येणारे नसतील व ते समारंभाच्या दिवशी सकाळी येऊन समारंभ आटोपल्यावर परत जाणार असतील, तर अल्पोपहाराची व्यवस्था ठेवावी.

शा.मु. रोटा. एच-२०४[२०००]३५१९८३.

...३..

सर्व

४. या समारंभाच्या संदर्भात येणारा/खर्च लेखा शीर्ष " २८८- सामाजिक सुरक्षा व कल्याण [इ] इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना निवृत्ती वेतन [मागणी क्रमांक - १३]" ला खर्ची टाकावा व चालू वर्षासाठी जी रक्कम त्या लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात आली आहे त्या मधून भागवावा.

हे आदेश वित्त विभागाच्या सल्ल्याने निर्गमित करण्यात येत आहेत. त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक - १५५५/इएक्सपी-४, दिनांक ३०.४.१९८३ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

दा. प. कांबळे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति :-

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उपमुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
महालेखापाल - महाराष्ट्र राज्य -१ मुंबई,
महालेखापाल - महाराष्ट्र राज्य - २ नागपूर,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी [ २५ प्रती प्रत्येकी ], ~~वित्त विभाग,~~
त्यांना विनंती करण्यात येते की, या आदेशाची प्रत जिल्हा गौरव समितीच्या सर्व सदस्यांना पुरवावी.,
मंत्रालयातील सर्व विभाग [ ५ प्रती प्रत्येकी ],
सदस्य उच्चाधिकार समिती,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,
त्यांना विनंती करण्यात येते की, या समारंभास प्रसिध्दी द्यावी.

0000

शा.मु.रोटा-एच-२०४ [१०००]३५१९८३.